## दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३५९/२०२२ मध्ये निशाणी क्र. १ वरील आदेश

रमेश शांताराम सैंदाणे वगैरे

**विरुध्द**

निरंक

**CNR NO** : **MHDH050023602022**

१. अर्जदार यांनी सदरचा अर्ज महाराष्ट्र रेग्युलेशन कायदा, १८२७, खंड ८ अन्वये वारसाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात असे कथन की, मयत शांताराम गरबड सैंदाणे हे अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडील, अर्जदार क्र. ४ चे सासरे व अर्जदार क्र. ५ आणि ६ चे आजोबा होते. शांताराम गरबड सैंदाणे यांचे दिनांक २२.०६.२००८ रोजी मौजे ऐचाळे, ता. साक्री, जि. धुळे येथे निधन झाले आहे. तसेच मयत शांताराम गरबड सैंदाणे यांची पत्नी नामे इंदुबाई शांताराम सैंदाणे यांचे देखील दिनांक २८.१२.२००५ रोजी निधन झाले आहे. तसेच मयत शांताराम गरबड सैंदाणे यांचा मूलगा नामे तुकाराम शांताराम सैंदाणे (अर्जदार क्र. ४ चे पती व ५, ६ चे पिता) यांचे देखील निधन झाले आहे. मयत शांताराम गरबड सैंदाणे यांचे मृत्यू पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांनी 'ते मयत शांताराम गरबड सैंदाणे यांचे कायदेशीर वारस आहेत' असे ठरवून मिळण्यासाठी सदरचा अर्ज केलेला आहे. अर्जदार यांना सदर वारस दाखला निश्चित कोणत्या हेतूसाठी पाहिजे याविषयी अर्जामध्ये कोणतेही कथन केलेले नाही, त्यांनी केवळ ते मयत शांताराम गरबड सैंदाणे यांचे वारस असल्याचे बाबीस औपचारिक मान्यता मिळणेसाठी दाखल केले आहे व तसा वारस दाखला देण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्ज दाखल केल्यानंतर अर्जाची जाहीर नोटीस दिल्याप्रमाणे ''दैनिक वार्ता'' या वृत्तपत्राच्या दिनांक ०२.११.२०२२ रोजीच्या अंकात प्रकाशित करण्यात आली व या अर्जाबद्दल संबंधितांना जर काही आक्षेप असेल तर त्यांनी याबाबत न्यायालयास लेखी कळविण्याविषयी सूचित करण्यात आले परंतु अद्यापपावेतो असा कोणताही आक्षेप या न्यायालयास प्राप्त झालेला नाही.

**४.** पुढील प्रश्न माझ्या विचारार्थ येतात, त्यावर मी खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| **अ. क्र.** | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्र. १ करीता –**

**५.** अर्ज व त्यातील कथने शाबीत करण्यासाठी अर्जदार यांच्यातर्फे अर्जदार क्र.१ रमेश शांताराम सैंदाणे यांना निशाणी क्रमांक ८ वर तपासले आहे. ज्या मजकुराचा अर्जात उल्लेख आहे तसाच मजकूर अर्जदार क्र. १ यांनी पुराव्यात पुन्हा कथन केलेला आहे. अर्जदार यांनी अर्जाच्या कथनाच्या पुष्ठयर्थ मयत शांताराम गरबड सैंदाणे यांच्या मृत्यू दाखल्याची प्रत (नि.क्र.९), मयत इंदुबाई शांताराम सैंदाणे यांच्या मृत्यू दाखल्याची प्रत (नि.क्र.१०), मयत तुकाराम शांताराम सैंदाणे यांच्या मृत्यू दाखल्याची प्रत (नि.क्र.११), अर्जदार क्र. १, ३ ते ६ यांच्या आधारकार्डच्या प्रती (नि.क्र. १२ आणि १६), जाहीर प्रगटन (नि.क्र.१७) इत्यादी कागदपत्रे दाखल करुन सिध्द केली आहेत.

**६.** अर्जदार यांच्यातर्फे देण्यात आलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा एकमेकास पुरक असून तो अबाधित आहे तसेच त्यांनी प्रस्तुत अर्जाच्या कथनाच्या पुष्ठयर्थ जाहीर प्रगटन (नि.क्र.१७) दिल्यानंतर त्याबाबत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. वरील चर्चेवरुन अर्जदार क्र. १ ते ६ हे मयत शांताराम गरबड सैंदाणे यांचे वारस आहेत असा निष्कर्ष काढण्यात येत आहे. अशा परिस्थितीत सदर वारस प्रमाणपत्र अर्जदार क्र. १ ते ६ यांचे नावे देणे उचित होईल. सबब, प्रश्न क्र.१ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवितो.

<u>**प्रश्न क्र. २ करीता**</u> –

**७.** अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे अर्जदार क्र. १ ते ६ हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत असा निष्कर्ष मी वर उल्लेख केल्याप्रमाणे नोंदविलेला आहे.

**८.** भारतीय वारसा कायदा, १९२५ चे कलम ३९० अन्वये बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट अंतर्गत देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रास भारतीय वारसा कायदा, १९२५ चे कलम ३९० लागू असून त्या अन्वये कोर्ट फी अ‍ॅक्ट अन्वये योग्य तो मुद्रांक लावणे आवश्यक असल्याबाबत तरतूद आहे. त्याप्रमाणे बॉम्बे रेग्युलेशन अन्वये देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रास देखील महाराष्ट्र कोर्ट फी अ‍ॅक्ट लागू असल्याने अर्जदार क्र. १ ते ६ यांनी महाराष्ट्र कोर्ट फी अ‍ॅक्टचे परिशिष्ट क्र. १ चे आर्टीकल १२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आर्टीकल १० व ११ अन्वये न्यायालयीन मुद्रांक भरणे आवश्यक व जरुरीचे आहे. परिणामतः हा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी प्रश्न क्र. २ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

**१.** अर्ज मंजूर करण्यात आला.

**२.** अर्जदार क्र. १ ते ६ यांना बॉम्बे रेग्युलेशन तरतुदींचे अ‍ॅपेंडीक्स 'ब' प्रमाणे मयत शांताराम गरबड सैंदाणे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दाखला <u>**केवळ अर्जात नमूद कारणांसाठी**</u> देण्यात यावा.

**३.** वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता अर्जदार यांनी योग्य ते न्यायालयीन मुद्रांक शुल्क न्यायालयात जमा करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KAILAS TRYAMBAK ADHAYKE
Date: 2023.02.09 17:35:25 +0530

साक्री. **( कैलास त्र्यं. अढायके)**

दिनांक – ०८.०२.२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, साक्री.

**: प्रमाणपत्र :**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न् शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव :– आर.एन.कुलकर्णी

न्यायालयाचे नांव :– दि.न्या.क.स्तर तथा न्यायदंडाधिकारी, प्र. वर्ग, साक्री.

पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक :– ०८.०२.२०२३

स्वाक्षरीत/–

लघुलेखक (३)